# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला

दि. २९/०६/२०२१

जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/ ३०६ /२०२१

### निविदा सूचना

**विषय:- सन २०२१-२२ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील पिकांचे संरक्षण करण्यासाठी भाडेतत्वावर घोडेस्वार लावणे करिता निविदा दर मागविणेबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे संरक्षण करणे करिता घोडेस्वारांचे दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/ निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेला आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला याचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी.
३. घोड्याची व घोडेस्वारांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.
४. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे घोडेस्वार संरक्षण करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदा धारका कडून वसूल करण्यात येईल.
५. घोडे व घोडेस्वार यांना नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जवाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.
६. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत विभागाचे प्रक्षेत्रावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.
७. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत विभागावर देण्यात आलेले पिक संरक्षणाचे काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
८. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे निविदा धारकांना बंधनकारक राहील.
९. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी घोडेस्वारांचे आधार कार्डची छायांकित प्रत कार्यालयास सादर करावी तसेच निविदा धारकांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयकाचा विचार केला जाणार नाही.
१०. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार **दि. १०.०७.२०२१** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# निविदा मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे संरक्षण करणे करिता घोडेस्वारांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | दर प्रति घोडेस्वार (रु.) | शेरा/वेळ |
|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे संरक्षण करणे (पूर्व-पश्चिम ५ कि.मी. उत्तर-दक्षिण ५ कि.मी. अंदाजे) | १) ८ तासाकरिता रु. ________ | १) सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपार्यंत (८ तास)<br>२) दुपारी ४ ते रात्री १२ वाजेपार्यंत (८ तास)<br>३) रात्री १२ ते सकाळी ८ वाजेपार्यंत (८ तास) |
| | | २) १६ तासाकरिता रु. ________ | |
| | | ३) २४ तासाकरिता रु. ________ | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण पत्ता